प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०४.०२.२०२२**

**सिडकोच्या ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेला उत्तम प्रतिसाद; आतापर्यंत १० हजार नागरिकांनी केली अर्ज नोंदणी**
**तळोजा नोड वास्तव्यासाठी उत्तम पर्याय असल्याचे झाले सिद्ध**

परवडणाऱ्या दरातील घरे, कनेक्टिव्हिटी आणि अन्य पायाभूत सोयी सुविधांमुळे नवी मुंबईमध्ये वास्तव्य करण्यासाठी तळोजा नोड हा सर्वसामान्य नागरिकांकरिता उत्तम पर्याय ठरत आहे. सिडकोच्या बहुतांशी गृहनिर्माण योजनांमधील गृहसंकुले तळोजा नोडमध्ये साकारण्यात आली आहेत. सिडकोने नुकत्याच आणलेल्या गृहनिर्माण योजने अंतर्गत तळोजा नोडमधील ५,७३० परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सिडकोच्या या गृहनिर्माण योजनेला उत्तम प्रतिसाद लाभत असून आत्तापर्यंत १० हजार नागरिकांनी या गृहनिर्माण योजनेत अर्ज नोंदणी केली आहे.

तळोजा हा नवी मुंबईतील वेगाने विकसित होणाऱ्या नोडपैकी एक आहे. तळोजा नोड नवी मुंबईतील वेगाने विकसित होणार नोड आहे. मुंबई-पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. मेट्रोचे आगार तळोजा येथे असून मेट्रो मार्गेही हा नोड सीबीडी बेलापूरला जोडला जाणार आहे. या नोडमधील काही क्षेत्र हे शाळा, पदवी महाविद्यालये, प्रार्थनास्थळे, रुग्णालये, समाजकेंद्रे, वसतिगृहे इ. सामाजिक उद्देशांकरिता राखीव आहे. मेट्रो रेल्वेच्या स्थानकांलगत वाणिज्यिक उपक्रमांकरिता काही क्षेत्र हे सिडकोकडून निश्चित करण्यात आले आहे. यामुळे तळोजा नोडमध्ये मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होणार आहेत. परवडणाऱ्या दरातील घरे, कनेक्टिव्हिटी, रोजगार, वाणिज्यिक प्रकल्प यांमुळे तळोजा नोड हा नवी मुंबईतील वास्तव्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरत आहे.

सिडको आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सातत्याने सर्वसामान्य नागरिकांकरिता नवी मुंबईमध्ये परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देत असते. सिडकोच्या बहुतांशी गृहनिर्माण योजनांमधील संकुले ही तळोजा नोडमध्येही साकारण्यात आली आहेत. सिडकोकडून २६ जानेवारी २०२२ रोजी ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजने अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या ५,७३० घरांपैकी १,५२४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि उर्वरित ४,२०६ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. या योजनेकरिता २४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत ऑनलाइन

अर्ज करता येणार आहेत. या योजनेमुळे सर्वसामान्य नागरिकांना तळोजा नोडमध्ये आपले हक्काचे घर घेण्याची व नवी मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरामध्ये वास्तव्य करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

---

मा.संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**